Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- I JANUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# मानवाधिकार व भारत

डॉ. अनिल उत्तम मोरे
श्री साई शिक्षण महाविद्यालय, चंद्रपूर

**प्रस्तावना:**

निसर्गनियमानुसार व्यक्ती इतर प्राण्याप्रमाणे स्वतंत्र होता. निसर्गाने त्याला अनेक अधिकार बहाल केले ज्यामुळे तो भूतलावर कोठेही वावरू शकत होता. स्वत: चा सर्वांगीन विकास करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या संसाधनांचा वापर करून स्वत: साठी अनुकूल वातावरणाची निर्मिती तो करू शकत होता. मात्र ज्यावेळी राज्य संस्था अस्तित्वात आली त्यांनतर त्याच्या नैसर्गिक स्वातंत्र्यावर अनेक बंधने आली. अनेक बंधनामध्ये तो अडकून पडला. कोणताही निर्णय घेण्यासाठी त्याला आता राज्यसंस्थेवर अवलंबून रहावे लागले. व्यक्तीच्या जीवीताला धोका निर्माण झाला. स्वातंत्र्यावर बंधने आली त्यातून त्याच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. व्यक्ती जन्मता: समान आहे. मात्र काही वर्चस्ववादी शक्तींनी व्यक्तींचे अधिकार हिरावून घेतले व व्यक्ती – व्यक्तीमध्ये भेदभाव निर्माण केला. व्यक्तीला गुलाम बनवून त्याचा अतोनात छळ केला त्याला अपमानकारक वागणूक दिली.

या सर्व बाबीपासून मुक्तता मिळविण्यासाठी व्यक्तीला काही अधिकार बहाल करण्यात आले आहेत. त्याशिवाय व्यक्ती आपल्या व्यक्तीमत्त्वाचा सर्वांगीण विकास करू शकत नाही. अधिकाराशिवाय मानवी जीवनाच्या अस्तित्वाची कल्पनाच करता येत नाही. व्यक्तीचा सर्वांगीन विकास करणे हे राज्याचे ध्येय आहे. हे ध्येय प्राप्त करण्यासाठी राज्याद्वारे व्यक्तीला जे अधिकार बाहाल करण्यात आले त्यालाच मानवाधिकार असे म्हणतात. फ्रेंच राज्यक्रांती नंतर मानवाधिकाराची जी घोषणा झाली त्यानुसार मानवाधिकाराचा स्विकार करण्यात आला.

**मानवाधिकाराचा अर्थ (Meaning of Human Rights):**

मानवी हक्काची जननी इंग्लडला मानल्या जाते. इंग्लंडमध्ये सर्वप्रथम १२१५ साली ' मॅग्नाकार्टा ' ही मानवी हक्काची सनद जाहीर करण्यात आली. १६८९ मध्ये ब्रिटिश राजाने मानवी हक्काच्या सनदेला मान्यता दिली. त्यातुनच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा उदय झाला. लोकांना केवळ हक्क देवून चालत नाही तर त्यांच्या रक्षणाची जबाबदारी राज्याने घेतली पाहिजे हा विचार समोर आला. मानवी हक्काला घटनात्मक संरक्षण दिल्याशिवाय मानवी समुदयाला सुरक्षितता लाभणार नाही व त्यांचा विकास होणार नाही. याची जाणीव झाली. थॉमस पेन, जॉन लॉक, जॉन स्टुअर्ट मिल इ. विचारवंतांनी मानवी हक्कांची चळवळ सुरू केली आणि त्यासाठी आवश्यक साहित्याची निर्मिती केली. अमेरिकेमध्ये १७७६ मध्ये स्वातंत्र्याचा जाहिरनामा सिध्द करण्यात आला. व त्यामध्ये मानवी स्वातंत्र्यावर भर देण्यात आला. १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांतीने जनतेच्या स्वातंत्र्याला, सार्वभौमत्वाला स्थान मिळवून दिले. व संपूर्ण जगाला स्वातंत्र्य, समता व न्याय ही लोकशाहीची तीन मूल्य बहाल केली.

त्यानुसार आपल्या देशाच्या संविधानात मानवी हक्कांचा समावेश करण्यात आला आहे. सर्वकष किंवा हुकूमशाही राज्यात राज्यसंस्था श्रेष्ठ असते. व्यक्तीने आपले सर्वस्व राज्यासाठी द्यावे. व्यक्ती गौण व राज्य श्रेष्ठ ही संकल्पना सर्वकष राज्यात अभिप्रेत असते. लोकशाहीत मात्र जनता सार्वभौम असते. लोकशही राज्य व्यक्तीला जास्तीतजास्त अधिकार किंवा हक्क प्रदान करते. व्यक्तीविकासाची संधी उपलब्ध करून देते.

**मानवाधिकाराच्या व्याख्या (Defination):**

१. व्यक्तीला जन्मता मानव म्हणून प्राप्त झालेल्या अधिकारांना मानवाधिकार म्हणतात.
(A Rights that inhere in a human being by virtue of his birth as a human being are human rights.)

२. डी. डी. बसू यांच्या मते, मानवाधिकार म्हणजे असा अधिकार की जो व्यक्तीला मानवी समुदायाचा एक घटक म्हणून राज्याच्या विरोधात प्राप्त झालेला हक्क होय.
(D. D. Basu defined human rights as those rights, which even - individual must have against the state or public authority by virtue of his being a member of the human family irrespective of any other considerations.)

**मानवाधिकाराचा उद्देश:**

जन्मता: सर्वच नागरिक समान आहेत. सरकारने त्यांच्या सर्व नागरिकांना समानतेने व सन्मानाने वागवावे. प्रत्येकाची गणती एकदाच व्हावी व कोणाचाही विचार एकापेक्षा जास्त वेळा होवू नये. राजकीय दृष्टीने सांगावयाचे असल्यास एक व्यक्ती एक मत, एकापेक्षा जास्त मत देण्याचा अधिकार कोणासही असणार नाही हे समानतेचे तत्त्व समाजात रूजवणे गरजेचे आहे. कायद्यासमोर सर्व नागरिक समान मानले जात असले तरी काही व्यक्तीबाबत वेगळा न्याय केला जातो. हे असे होवू नये, खऱ्या अर्थाने नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, त्यांच्या निकोप विकासासाठी योग्य त्या वातावरणाची निर्मिती राज्याने करणे गरजेचे आहे.

आपल्या दैनदिन जीवनामध्ये अन्य व्यक्तींशी वर्तन करतांना आपली तसी दुसऱ्याची प्रतिष्ठा राखणे गरजेचे असते. जर इतरांची प्रतिष्ठा राखली नाही तर समाजामध्ये तणावाची परिस्थिती निर्माण होते. हे थांबवण्यासाठी एकमेकांचा सन्मान

करणे गरजेचे आहे. यासाठी मानवाधिकार महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

**मानवी हक्कांचा जाहिरनामा:**

१० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्काचा जाहिरनामा घोषित केला. त्यामुळे १० डिसेंबर हा दिवस ' मानवी हक्क दिन ' म्हणून पाळला जातो. मानवी हक्काच्या सनदेत एकुण २९ कलमे आहेत. त्यामध्ये राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क जाहीर करण्यात आले आहेत. ते पुढीलप्रमाणे:

१. प्रत्येकाला जीविताचा, स्वातंत्र्याचा व सुरक्षिततेचा अधिकार आहे.
२. माणसाची खरेदी – विक्री करता येणार नाही. कोणीही गुलाम किंवा दास राहणार नाही.
३. कायदयासमोर सर्व व्यक्ती समान असतील.
४. कोणाचाही शारीरिक छळ केला जाणार नाही. क्रुर, अमानुष, अपमानकारक वागणूक दिली जाणार नाही.
५. हक्कांवर अतिक्रमण झाल्यास न्यायालयाकडे दाद मागता येईल.
६. कोणालाही विनाकारण अटक किंवा स्थानबध्द करता येणार नाही.
७. गुन्हा सिध्द होईपर्यंत कोणालाही गुन्हेगार म्हणता येणार नाही.
८. प्रत्येकाला न्यायालयात आपला बचाव करता येईल.
९. प्रत्येकाला खाजगी जीवन जगता येईल.
१०. संचार व निवासस्वातंत्र्य असेल.
११. दुसऱ्या देशात राजकीय आश्रय घेता येईल.
१२. मतस्वातंत्र्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्य असेल.
१३. सभा घेण्याचे व संघटना बनविण्याचे स्वातंत्र्य असेल.
१४. शासनात सहभागी होण्याचे स्वातंत्र्य असेल. योग्यतेनुसार पद प्राप्त करता येईल.

**आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क (कलम २२–२९)**

१. सामाजिक सुरक्षिततेचा अधिकार असेल.
२. काम करण्याचा व आवडीनुसार रोजगार करण्याचा अधिकार.
३. विश्रांतीचा अधिकार.
४. शिक्षणाचा अधिकार.
५. सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार.
६. आरोग्यदायी, चांगले कौटुंबिक जीवन जगण्याचा अधिकार.

**संयुक्त राष्ट्रसंघ आणि मानवाधिकार:**

संयुक्त राष्ट्रसंघाने मानवाधिकाराला अतिशय महत्वाचे स्थान दिले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या चार्टरमध्ये त्याचा समावेश करण्यात आला आहे. जगातील सर्व मानव जातीच्या विकास व कल्याणासाठी पोषक वातावरणाची निर्मिती करणे संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीचे हीत जोपासले जावे आणि कोणावरही अन्याय होवू नये या भूमिकेतून संयुक्त राष्ट्रसंघ मानवाधिकाराची वेळोवेळी दखल घेतो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या चार्टरमध्ये मानवाधिकाराबाबत पुढील बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

१. प्रस्तावनेमध्ये मानवाचा मुलभूत अधिकार, मानवी व्यक्तिमत्त्वाचा गौरव व महत्त्व, पुरूष व स्त्रियांना समान अधिकार यावर विश्वास व्यक्त केला आहे.
२. अनुच्छेद १ मध्ये उद्देशाचे वर्णन, मानवाधिकाराप्रती प्रतिष्ठेला बढावा देणे, तसेच जाती, लिंग, भाषा, धर्म यावर आधारीत भेदभाव न करता मुलभूत अधिकारांना प्रोत्साहन देणे.
३. अनुच्छेद १३ मध्ये महासभेद्वारे, जाती, धर्म, भाषा, लिंग या आधारावर भेदभाव न करता मुलभूत अधिकार आणि मुलभूत स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी सहाय्य करणे.
४. अनुच्छेद ५६ नुसार सर्व सभासद राष्ट्रे मानवाधिकार आणि मानवी स्वातंत्र्य यांच्या प्राप्तीसाठी संयुक्त राष्ट्रसंघाला मदत करतील.
५. अनुच्छेद ६२ नुसार, आर्थिक आणि सामाजिक परिषदेद्वारे सर्वांसाठी मानवाधिकार आणि मुलभूत स्वातंत्र्याप्रती सन्मानाची भावना वाढीस लावणे आणि त्यांच्या पालनासाठी शिफारस करण्याची व्यवस्था करण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या चार्टरमध्ये प्रथम मानवाधिकार आणि मुलभूत स्वातंत्र्याच्या सुरक्षिततेवर भर देण्यात आल्याचे दिसून येते. चार्टरनुसार संयुक्त राष्ट्रसंघाला मानवाधिकारासंबंधी प्रोत्साहन देण्याचा अधिकार आहे. परंतु कोणतीही कार्यवाही करण्याचा अधिकार नाही. चार्टरमध्ये मानवाधिकार आणि मुलभूत स्वातंत्र्याचा उल्लेख आहे. परंतु त्याची निश्चित व्याख्या करण्यात आली नाही. संयुक्त राष्ट्रसंघाचा उद्देश जाती, धर्म, लिंग, भाषा याच्या आधारे भेदभाव न करता सर्वांना समान वागणूक देणे.

**भारतीय राज्यघटना आणि मानवाधिकार:**

भारत हा लोकशाही, सार्वभौम देश आहे. भारतामध्ये विविध जाती, धर्म, पंथ आणि संस्कृतिचे लोक राहतात. विविधतेने नटलेल्या या देशामध्ये प्रचंड विषमता भरलेली दिसून येते, काही लोक खुप श्रीमंत तर काही खुपच गरीब, मोठयाप्रमाणात शिक्षणाचा अभाव यामुळे भारतीय समाजातील काही घटक पिढयानपिढया दबले गेले आहेत. सर्व प्रकारची संधी त्यांना नाकारण्यात आली. सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशामध्ये दुर्बल घटकांनाही न्याय देणे गरजेचे होते. त्यांना राजकीय प्रक्रियेमध्ये समावून घेणे महत्त्वाचे होते म्हणून भारतीय घटनाकारांनी संविधानामध्ये मुलभूत हक्कांचा समावेश केला. आणि त्याआधारे मानवाधिकार जपण्याचे कार्य केलेले दिसून येते.

**घटनेतील मुलभूत हक्काविषयी तरतुदी:**

भारतीय घटनेच्या तिसऱ्या भागामध्ये कलम १२ ते ३५ मध्ये मुलभूत हक्क सांगण्यात आले आहेत ते पुढीलप्रमाणे:

१. समतेचा हक्क
२. स्वातंत्र्याचा हक्क

३. शोषणाविरूध्द हक्क
४. संस्कृती व शिक्षणविषयक हक्क
५. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क
६. घटनात्मक उपायांचा हक्क

कलम ३२ व २२६ नुसार मुलभूत हक्काच्या रक्षणासाठी व्यक्तीला न्यायालयात दाद मागण्याचा हक्क बहाल करण्यात आला आहे. त्यामध्ये १. बंदी प्रत्यक्षिकरण २. परमादेश ३. अधिकार पृच्छा ४. प्रतिषेध ५. उत्प्रेक्षण. याचबरोबर घटनेच्या मार्गदर्शक तत्वामध्ये स्त्री – पुरूष समानता, कामाचे तास, विश्रांतीच्या वेळा, बालमजुरीला बंदी, सार्वत्रिक व मोफत शिक्षण, आजार, अपघात, वृध्दावस्था इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय मानवी हक्क आयोग:**

१९९३ मध्ये भारतीय संसदेने मानवी हक्क संरक्षण कायदा मंजूर करून राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना केली. आयोगाचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे.

**राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची रचना:**

राष्ट्रीय मानवी हक्क आयोगामध्ये ९ सदस्य असतात. त्यांची नेमणूक राष्ट्रपतीद्वारे होते. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश त्याचे अध्यक्ष असतात. इतर सदस्य पुढीलप्रमाणे:

१. सर्वोच्च न्यायालयातील एक पदासीन किंवा निवृत्त न्यायाधिश.
२. उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधिश किंवा निवृत्त न्यायाधिश.
३. मानवी हक्काचे विशेष ज्ञान असणारे दोन सदस्य.
४. अनुसूचित जाती व जमातीच्या राष्ट्रीय आयोगाचे अध्यक्ष.
५. राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष.
६. राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्ष.

वरील सर्व सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपती सहा सदस्यीय समितीच्या शिफारशीनुसार करतात. या समितीमध्ये १. पंतप्रधान २. लोकसभेचे उपसभापती ३. लोकसभेतील विरोधी पक्षनेता ४. राज्यसभेचे उपसभापती ५. गृहमंत्री ६. अन्य एक मंत्री.

**कार्यकाल:**

राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. सदस्यांची फेरनिवड करता येते. सदस्यांचे निवृत्तीचे वय ७० वर्षे आहे.

**बडतर्फी:**

१. गैरवर्तन किंवा अकार्यक्षमता या कारणावरून सदस्यांना राष्ट्रपती बडतर्फ करू शकतात.
२. नादारी, शारीरिक किंवा मानसिक विकलांगता, तुरूंगवासाची शिक्षा इ. कारणावरून बडतर्फ केले जावू शकते.

**अधिकार व कार्य:**

१. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी असणाऱ्या कायदयांची अंमलबजावणी करण्यास सरकारला भाग पाडणे.
२. अन्यायग्रस्त व्यक्तीच्या वतीने किंवा स्वत: हून मानवी हक्काच्या उल्लंघनाची चौकशी करणे.
३. तुरूंगातील कैद्यांच्या स्थितीबाबत राज्यशासनास शिफारस करणे.
४. मानवी हक्काबाबत कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देणे.
५. आंतरराष्ट्रीय करारांचा व कायद्यांचा अभ्यास करून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी शिफारशी करणे.
६. मानवी हक्काविषयी चर्चासत्राचे आयोजन करणे.
७. केंद्रसरकारला मानवी हक्काबाबत अहवाल सादर करणे.
८. प्रकाशने, प्रसारमाध्यमे, चर्चासत्रे इ. द्वारे समाजामध्ये जाणीव जागृती करणे.
९. मानवी हक्काच्या क्षेत्रात संशोधन करणे.
१०. मानवी हक्काची पायमल्ली होणार नाही याची दक्षता घेणे.

**कार्यपध्दती:**

मानवी हक्क आयोगाला न्यायालयासारखे अधिकार असतात. व्यक्तीला साक्षीसाठी बोलावणे, साक्ष नोंदविणे, गुन्हयातील आवश्यक कागदपत्रे गोळा करणे इ. अधिकार असतात. चौकशी करून शिक्षा किंवा नुकसानभरपाई देण्याची शिफारस केंद्र सरकारला करू शकतात. माहिती देणे व्यक्तीवर बंधनकारक असते.

अशाप्रकारे मनुष्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी मानवाधिकारचे महत्वाचे योगदान आहे. समाजातील सामाजिक विषमता दूर करून समता प्रस्तापित करणे गरजेचे आहे. तरच व्यक्तीला सहज, सुंदर जीवन जगता येईल आणि त्यातून व्यक्तीचा विकास होवू शकेल. व्यक्ती विकासातून सामाजिक न्यायाची संकल्पना प्रस्तापित करता येईल. समाजामध्ये सामाजिक न्याय, स्वातंत्रता व बंधुभाव निर्माण झाल्यास गुन्हेगारीला वचक बसेल. आणि राष्ट्राची उन्नती होण्यास मदत होईल.

**संदर्भ:**

1. D. D. Basu, Human Rights in Constitutional Law (1994)
2. S. L. Bhalla, Human Rights (1991)
3. Veena Pany Pandey, International Perspectives on Human Rights, Mohit Publication, New Delhi (1999)
4. www.google.co.in